**ठळक बातम्या**

- छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती राज्यभरात उत्साहात साजरी; शिवनेरीवर मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत शासकीय सोहळा

- एसटीच्या ताफ्यात यंदा पहिल्या टप्प्यात ८ हजार ३०० गाड्या दाखल होणार असल्याची परिवहन मंत्र्यांची माहिती

- इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन, कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होण्याची आवश्यकता व्यक्त

- पवित्र रमजान महिन्याला आजपासून सुरुवात

**आणि**

- सेन्सेक्समधे १ हजार २३६ अंकांची तर निफ्टीत ३६५ अंकांची घसरण

<><><><><>

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज राज्यभरात उत्साहात साजरी होत असून ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

राज्यातला मुख्य शासकीय सोहळा महाराजांचं जन्मस्थान असलेल्या किल्ले शिवनेरीवर मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी किल्ल्यावरच्या शिवकुंजावर छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. फडनवीस यांनी शिवनेरीवर परंपरेप्रमाणे बाळ शिवरायांचा पाळणा झुलवला आणि शिवरायांच्या पालखीची विधिवत पूजा केली. यावेळी महिलांनी पाळणा गाऊन संपूर्ण परिसर शिवमय करून टाकला. महाराजांनी उभारलेलं स्वराज्य हे अन्याय आणि दडपशाही मुक्त राज्य होतं आणि त्यात महिलांचा सन्मान, शेतकऱ्यांचं कल्याण आणि प्रत्येक जाती-धर्माच्या व्यक्तीला न्याय मिळत

होता, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. महाराजांचं जलव्यवस्थापन, करप्रणालीतली सुधारणा आणि नौदलाच्या उभारणीतली दूरदृष्टी, याचा मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात विशेष उल्लेख केला. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, तसंच अन्य मान्यवर उपस्थित होते.

शिवजयंती हा 'आत्मभानाचा सण' असून महाराजांनी रयतेच्या मनात स्वाभिमानाचं स्फुल्लिंग चेतवलं, ज्यामुळे आजही सामाजिक वीण घट्ट आहे, असं ज्येष्ठ नेते **शरद पवार यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे**.

तर शिवराय मनामनात आणि शिवजयंती घराघरात साजरी करण्याचं आवाहन, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष **हर्षवर्धन सपकाळ यांनी** केलं आहे.

**<><><><><>**

राज्यात शिवजयंतीनिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. याविषयी अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…..

**----व्हीसी----**

*(**मुंबईत** छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस इथे शिवजन्मोत्सवाचा देखावा साकारण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती आज **पुणे** शहर आणि जिल्ह्यात अत्यंत उत्साहात साजरी झाली.*

***नागपुरात** आज पहाटे ५ वाजल्यापासूनच महाराजांच्या पालखी सोहळ्याला सुरुवात झाली. महिलांचं मुद्रा पथक या सोहळ्याचं मुख्य आकर्षण ठरलं.*

***छत्रपती** संभाजीनगर इथं दुचाकी, चारचाकी वाहन फेऱ्यांसह विविध ठिकाणी रक्तदान शिबीरं तसंच आरोग्य तपासणी शिबीरं आणि विविध स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. **नाशिक** शहराच्या चौकाचौकात शिवरायांच्या जीवनावर आधारीत देखावे तसंच अश्वारूढ पुतळे उभारण्यात आले आहेत.*

***यवतमाळ**मध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त "जय छत्रपती शिवाजी" पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं.*

***भंडाराच्या** लाखनीतल्या समर्थ मैदानावर प्रसिद्ध रांगोळीकार भैरवी निर्वाण यांनी शिवरायांची ६०x१० फूट एवढी भव्य रांगोळी काढली आहे.*

***अहिल्यानगर** जिल्ह्यात शिवरायांची वेषभूषा केलेल्या विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली.*

*शिवजयंती निमित्त **धुळ्यात** आकर्षक शोभायात्रा निघाली.*

*छत्रपती शिवाजी महाराजांच्या **सिंधुदुर्ग** किल्ल्यावरच्या शिवराय मंदिरात शिवजयंती निमित्त मोठ्या संख्येनं शिवभक्त सहभागी झाले होते. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीच औचित्य साधून सिंधुदुर्ग जिल्ह्यात कणकवली शहराच्या वैभवात भर टाकणाऱ्या भव्य 'मराठा सांस्कृतिक भवन, कलादालन आणि उद्यान' प्रकल्पाचं भूमिपूजन आज पालकमंत्री नितेश राणे यांच्या हस्ते झालं.*

*महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई तसच जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आज **बीड** मध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.*

*राज्य शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या वतीनं, **नाशिक** मध्ये महाकवी कालीदास कलामंदिरात रायगडाला जेव्हा जाग येते, हे नाटक सादर करण्यात आलं.*

*राजमाता जिजाऊंचं माहेर असलेल्या मातृतीर्थ **बुलडाणा** जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त खामगाव सह आदिवासी जळगाव जामोद तालुक्यात विविध कार्यक्रम झाले)*

**<><><><><>**

एसटीच्या दीर्घकालीन धोरणानुसार पुढच्या काही वर्षांत २० ते २५ हजार बसगाड्या खरेदी करण्याला राज्य शासनाची तत्वतः मान्यता मिळाली असून, यंदा पहिल्या टप्प्यात ८ हजार ३०० गाड्या दाखल होणार आहेत. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी पत्रकाद्वारे ही माहिती दिली. राज्य शासनानं महिलांना तिकिटात ५० टक्के सवलत आणि ७५ वर्षांवरच्या ज्येष्ठांना मोफत प्रवास दिल्यानं प्रवाशांचा ओघ पुन्हा वाढू लागला. सध्या दररोज सुमारे ५० लाख प्रवासी एसटीने प्रवास करतात; मात्र अनेक मार्गांवर फेऱ्या अपुऱ्या पडत आहेत, असं त्यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असून, विशेषतः ग्लोबल साऊथ साठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत भारत मंडपम इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट २०२६ चं औपचारिक उद्घाटन करताना बोलत होते. जगातली सर्वात मोठी तरुण लोकसंख्या, आणि सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रतिभेचं केंद्र असलेल्या भारतात एआय, म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेवरच्या परिषदेचं आयोजन होत असून, ग्लोबल साऊथ मधल्या देशांसाठी ही अभिमानास्पद गोष्ट आहे, असं ते यावेळी म्हणाले.

**- - होल्ड बाईट मोदी - -**

कृत्रिम बुद्धिमत्ता हा मानवी इतिहासातला एक परिवर्तनकारी अध्याय असून, भारत केवळ एआय क्रांतीचा भाग नाही, तर त्याचं नेतृत्व करतो, आणि त्याला

आकार देतो, असं पंतप्रधान म्हणाले. या परिषदेला जगभरातले नेते आणि उद्योग आघाडीच्या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित आहेत.

**<><><><><>**

चंद्रपूरमध्ये संख्याबळ असूनही महापौरपदाच्या निवडणुकीत झालेल्या पराभवाची चौकशी करण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचा निर्णय प्रदेश काँग्रेसनं घेतला आहे. काँग्रेसचे राज्य प्रभारी रमेश चेन्निथला यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच ही समिती स्थापन केली जाईल अशी माहिती काँग्रेसच्या एका ज्येष्ठ नेत्यानं दिली. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनीही या प्रकरणाची चौकशी करायला सहमती दर्शवल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मुस्लिम समाजामध्ये पवित्र समजला जाणारा रमजानचा महिना आजपासून सुरू झाला. काल संध्याकाळी देशाच्या अनेक भागात चंद्रदर्शन झालं. रमजान हा इस्लामिक दिनदर्शिकेतला नववा महिना आहे. महिन्याच्या शेवटी ईद-उल-फित्र साजरी केली जाते.

**<><><><><>**

अमेरिका आणि इराणमधल्या वाढत्या भू-राजकीय तणावामुळे निर्माण झालेल्या अस्थिरतेचे परिणाम आज भारतीय शेअर बाजारावर उमटले. खनिज तेलांच्या किमतीने आज उच्चांक गाठला. त्यामुळे गेले तीन दिवस तेजी नोंदवणाऱ्या भारतीय शेअर बाजारांमध्ये आज तीव्र घसरण पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज १ हजार २३६ अंकांची घसरण झाली, आणि तो ८२ हजार ४९८ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ३६५ अंकांनी घसरुन २५ हजार ४५४ अंकांवर बंद झाला.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर असलेल्या भारतीय संघाला आज कॅनबेरा इथं झालेल्या दुसऱ्या टी ट्वेंटी सामन्यात पराभव पत्करावा लागला. यजमान ऑस्ट्रेलियानं प्रथम फलंदाजी करताना ५ गडी गमावून १६३ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना भारताला ९ गडी गमावून १४४ धावाच करता आल्या.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज कोलकता इथं झालेल्या सामन्यात वेस्ट इंडिजनं इटलीवर ४२ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजनं ६ गड्यांच्या मोबदल्यात १६५ धावा केल्या. मात्र, इटलीचा संघ १८ षटकातच १२३ धावात गारद झाला.

कोलंबो इथं सुरु असलेल्या, दुसऱ्या सामन्यात श्रीलंकेनं झिम्बाब्वेपुढं विजयासाठी १७९ धावांचं आव्हान ठेवलं आहे.

<><><><><>

निवडणुकीच्या आधी राज्य सरकारांकडून जाहीर होणाऱ्या मोफत सुविधा आणि योजनांवर सर्वोच्च न्यायालयानं आज ताशेरे ओढले. तमिळनाडू पॉवर डिस्ट्रीब्युशन कंपनी लिमिटेडनं दाखल केलेल्या याचिकेवरची ही सुनावणी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पंचोली यांच्या खंडपीठासमोर झाली.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयाची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय आपण देश सोडून जाणार नाही असं हमीपत्र उद्योजक अनिल अंबानी यांनी आज दाखल केलं. रिलायन्स कम्युनिकेशन्स लिमिटेडशी संबंधित मोठ्या बँक कर्जांच्या घोटाळा प्रकरणात सध्या सुरू असलेल्या चौकशीच्या पार्श्वभूमीवर अनिल अंबानी यांनी हे हमीपत्र दिलं आहे.

//<><><><><>//